महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९९१ /२०२२ दि. १ /१२/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगर पालिका क्षेत्रामध्ये लोकमत मिडीया प्रा.लिमीटेड यांचे वतीने नागरिकांमध्ये आरोग्यविषयी जनजागृती व्हावी या हेतुने लोकमत महामॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दिनांक ०४/१२/२०२२ रोजी सकाळी ०५:०० ते १०:०० वाजेपावेतो होणार आहे. सदर मॅरेथॉन मध्ये पहिला टप्पा २१ कि.मीटर, दुसरा टप्पा १०कि.मीटर, तिसरा टप्पा ५ कि.मीटर, चौथा टप्पा ३ कि.मीटर असा असुन मॅरेथॉन प्रारंभ रेमंड मैदान ठाणे येथुन सुरू होवुन रेमंड मैदान येथे समाप्त होणार आहे.

**ज्याअर्थी,** प्रारंभ– रेमंड मैदान येथुन सुरू होवुन रेमंड गेट – डावीकडे वळण घेवुन वर्तकनगर नाका – शास्त्रीनगर नाका – शिवाईनगर सर्कल– येउर गेट – उपवन लेक – पायलादेवी मंदिर – बिरसा मुंडा चौक – पवारनगर रोडने – वसंत विहार क्लब – यु टर्न घेवुन परत पवारनगर रोडने तुळशीधाम सर्कल – डॉ.काशिनाथ घाणेकर चौक – खेवरा सर्कल – टिकुजिनीवाडी वॉटर पार्क डावीकडे वळुन डिमार्ट खेवरा सर्कल – डॉ. काशिनाथ घाणेकर चौक – तुळशिधाम सर्कल – गांधीनगर चौक – बेथनी हॉस्पीटल – बिरसा मुंड चौक येथुन सरळ पुढे उपवन लेक – येउर गेट– शिवाईनगर – शास्त्रीनगर नाका – वर्तकनगर नाका येथुन रेमंड मैदान येथे समाप्त होणार आहे.

**ज्याअर्थी,**या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पहाण्यासाठी मोठया प्रमाणात दरवर्षी प्रेक्षकांची गर्दी होते. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत ठाणे शहरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित ठेवण्यासाठी स्पर्धेच्या मार्गावरील वाहतुकीत बदल करणे आवयक आहे.

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) बिरसा मुंडा चौकातुन पवारनगरकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना बिरसा मुंडा चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने पवारनगर कडुन बिरसा मुंडा चौकाकडे येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यंत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वसंत विहार चौकातुन काशिनाथ घाणेकर चौकाच्या दिशेने जाणा–या वाहनांसाठी काशिनाथ घाणेकर चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने काशिनाथ घाणेकर चौकाकडुन वसंत विहार चौकाकडे येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यंत दुहेरीमार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) काशिनाथ घाणेकर चौकातुन खेवरा सर्कल दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना काशिनाथ घाणेकर चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने खेवरा सर्कल कडुन काशिनाथ घाणेकर चौकाकडे येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) खेवरा सर्कलकडुन टिकुजीनिवाडी सर्कल दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना खेवरा सर्कल येथे. **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने टिकुजीनिवाडी सर्कलकडुन खेवरा सर्कल दिशेने येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) बिरसामुंडा चौकाकडुन गांधीनगर दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना बिरसा मुंडा चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने गांधीनगरकडुन बिरसामुंडा चौक दिशेने येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

CamScanner

**प्रवेश बंद –** ६) गांधीनगर चौकाकडुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना गांधीनगर चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौककडुन गांधीनगर चौक दिशेने येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यंत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) शास्त्रीनगर – वर्तकनगर कडुन रेमंड कॅडबरी जंक्शनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना शास्त्रीनगर चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने कॅडबरी जंक्शनकडुन वर्तकनगर –शास्त्रीनगर चौक दिशेने येणा–या वाहिनीवरून डाव्या बाजुने मार्गस्त होतील. नमुद वाहिनी मॅरेथॉन स्पर्धा संपेपर्यंत दुहेरी मार्ग करण्यात येत असुन सदरची वाहने पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ८) देवदयानगर – शिवाईनगर – येउर गेट – बिरसामुंडा चौक कडुन रेमंड कॅडबरी जंक्शनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना देवदयानगर कट येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने बिरसामुंड चौक – बेथनी हॉस्पीटल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग–** येउर गेट कडुन येणारी सर्व प्रकारची वाहने उपवन तलाव पायलादेवी मंदिर – बिरसा मुंडा चौकातुन पुढे इच्छीत स्थळी जातील.

**मॅरेथॉन स्पर्धेच्या संपुर्ण मार्गावर स्पर्धा संपेपर्यत–रस्त्याचे दोन्ही बाजूस सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसचुना ही पोलीस वाहने, रूग्ण वाहिका, फायर ब्रिगेड व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच मॅरेथॉन स्पर्धेतील वाहनास लागू राहणार नाही. सदरची वाहतुक अधिसचुना ही दि. ०४/१२/२०२२ रोजी सकाळी ०५.०० ते १०.०० वा. पावेतो अमलात राहिल.

**( डॉ. विनयकुमार राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५ / वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे / वागळे, व पो.निरी. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner